पोलीस अधीक्षक कार्यालय
(जिल्हा विशेष शाखा, सातारा)
७६ मल्हारपेठ, सातारा
Email :- spsatara@mahapolice.gov.in
pidsb.satara@mahapolice.gov.in

क्रमांक : : जिविशा-७/गणेशोत्सव/ ३६ आदेश/२०२५ -५९६८ सातारा दि. ०४/०८/२०२५

**विषय : मुंबई पोलीस अधिनियम १९५१ (सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियम २०१४ चे कलम ३६**

**आ दे श :-**

ज्या अर्थी दिनांक ०९/०८/२०२५ गणेश मुर्ती आगमन सोहळा सुरू होणार आहे. दिनांक १५/०८/२०२५ रोजी गोकुळ अष्टमी व दिनांक १६/०८/२०२५ रोजी दहिहंडी उत्सव, दिनांक २७/०८/२०२५ ते दिनांक ०६/०९/२०२५ या कालावधीत गणेशोत्सव व दिनांक ०५/०९/२०२५ रोजी ईद ए मिलाद हे सण/उत्सव साजरे होणार आहेत. नमुद सणाचे/उत्सवाचे निमित्ताने सातारा जिल्हयात काही ठिकाणी मिरवणुका/कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. तसेच या संबधाने मिरवणुका कोणत्या मार्गाने व कोणत्या वेळी काढाव्यात किंवा काढू नये, मिरवणुकीतील तसेच कार्यक्रमातील व्यक्तींचे वर्तन कसे असावे, मिरवणुकीच्या व जमावांच्या प्रसंगी कोणत्याही रस्त्यावरुन किंवा सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक गर्दी होणार असेल किंवा अडथळा होणार असेल अशा सर्व प्रसंगी अडथळा होऊ न देणेकरीता व ढोल, ताशे इतर वाद्ये वाजविण्याचे विनियमन करुन नियत्रंण ठेवणे ध्वनी प्रदुषणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने घातलेल्या निर्बंधाचे पालन होवून लाऊड स्पिकरचा वापर योग्य प्रकारे व्हावा याकरीता निर्बंध घालणे आवश्यक आहे.

आणि ज्या अर्थी या कालावधीत कायदा व सुव्यवस्था बंदोबस्तासाठी कर्तव्यावर नेमण्यात आलेल्या सर्व संबंधीत पोलीस अधिकारी व त्यांचेहुन वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१ (सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियम २०१४ चे कलम ३६ नुसारचे अधिकार प्रदान करणे जरुरीचे आहे.

त्या अर्थी मी, **तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा,** मला मुंबई पोलीस अधिनियम १९५१ (सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियम २०१४ चे कलम ३६ नुसार असलेल्या अधिकाराचा वापर करुन दिनांक ०९/०८/२०२५ ते दिनांक ०८/०९/२०२५ या कालावधीकरीता कायदा व सुव्यवस्था बंदोबस्तासाठी नेमलेले सर्व संबंधीत पोलीस अधिकारी व त्यांचेहुन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना खालील प्रमाणे अधिकार प्रदान करीत आहे.

अ) रस्त्यावरील किंवा रस्त्याने जाणाऱ्या मिरवणूकीतील किंवा जमावातील लोकांनी कशा रितीने चालावे, त्यांनी वागणूक किंवा वर्तणुक कशी ठेवावी, या विषयी निर्देश देणे.

ब) अशा कोणत्याही मिरवणूका या कोणत्याही मार्गाने, कोणत्या वेळात काढाव्यात किंवा काढू नयेत असे मार्ग व अशा वेळा विहित करणे.

क) सर्व मिरवणूकींच्या व जमावाच्या प्रसंगी व उपासनेच्यावेळी/नमाज पठणाचे वेळी कोणत्याही रस्त्यावरुन किंवा सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक स्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळा होण्याचा संभव असेल अशा सर्व प्रसंगी अडथळा होऊ न देणे यासाठी योग्य ते आदेश देणे.

ड) सर्व रस्त्यावर व रस्त्यामध्ये घाट किंवा घाटावर सर्व धक्क्यांवर किंवा धक्क्यामध्ये आणि सार्वजनिक स्नानांच्या, कपडे धुण्याच्या व उतरण्याच्या जागांच्या ठिकाणी व जागांमध्ये देवालय आणि इतर सर्व सार्वजनिक स्थळी सुव्यवस्था राखणेसाठी योग्य ते आदेश देणे

इ) कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्याजवळ ढोल, ताशे व इतर वाद्ये वाजविणे व गाणी गाण्याचे, शिंगे व इतर कर्कश वाद्य वाजविणे यांचे विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य ते आदेश देणे.

ई) कोणत्याही सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ किंवा कोणत्याही सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी लोकांना उपद्रव होऊ नये म्हणून ध्वनीक्षेपकाचा (लाऊडस्पिकर)उपयोग करणेचे विनियमन करणे, व त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी योग्य ते आदेश देणे.

फ) सक्षम प्राधिकाऱ्यांनी या अधिनियमांचे कलम ३३, ३५, ३७ ते ४०, ४२, ४३ व ४५ या अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास अधिन असलेले व त्यास पुष्टी देणारे योग्य ते आदेश देणे.

(तुषार दोशी)भा.पो.से
पोलीस अधीक्षक,सातारा

प्रति,

१. मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे. महाराष्ट्र राजपत्रामध्ये आदेश प्रसिध्द करून प्रती रेकॉर्डकरीता पटविण्याबाबत.

२. सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा, सर्व पोलीस निरीक्षक, सातारा जिल्हा ,सर्व सहायक पोलीस निरीक्षक, सातारा जिल्हा सर्व पोलीस उपनिरीक्षक,सातारा जिल्हा.

प्रत प्रसिध्दीकरीता – जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी सातारा

२/- सर्व संपादक, वृत्तपत्र प्रतिनिधी, केबल नेटवर्क द्वारे प्रसिध्दीसाठी